# विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा – 2015

## प्रमाणपत्रे तपासणीच्या कार्यक्रमाबाबतची घोषणा

आयोगातर्फे दि. 31 जानेवारी, 2016 रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आलेल्या विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा 2015 मधील उपस्थित एकूण 54 उमेदवारांना माझगांव कार्यालयातील आयोगाचे परीक्षा दालन येथे दि. 14 व 15 मार्च, 2016 रोजी प्रमाणपत्रे तपासणीसाठी बोलाविण्यात येत आहे. सदर उमेदवारांनी त्यांची मूळ प्रमाणपत्रे व विभागप्रमुखांकडून प्रमाणित करुन देण्यात आलेल्या परिशिष्ट – 6 ची प्रत तसेच प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींसह (2 संच) उपस्थित रहावे. उमेदवारांना प्रमाणपत्रे तपासणीचे पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध होईल.

2. विहित अटींची पूर्तता न करणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच प्रमाणपत्रे तपासणीसाठी अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा अंतिम गुणवत्ता यादीसाठी विचार केला जाणार नाही. प्रमाणपत्र तपासणीअंती विहित अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांची वर्गवारी, गुणवत्ताक्रम व प्रवर्गनिहाय पदसंख्या इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाकडे शिफारस करण्यात येईल. त्यामुळे प्रमाणपत्र तपासणीसाठी बोलाविण्यात आलेल्या व विहित अटींची पूर्तता करणा-या सर्वच उमेदवारांची शिफारस होईल असे नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

3. अर्जात विजा(अ), भज(ब), विमाप्र, भज(क) व भज(ड) वर्गवारीचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या पूर्वीच्या वित्तीय वर्षापासूनचे क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र, तपासणीच्यावेळी सोबत आणावे.

4. प्रस्तुत सविस्तर कार्यक्रम कृपया आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईट वर पहावा.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 26 फेब्रुवारी, 2016

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**